# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि. १८ जानेवारी, २०२५

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली असून विद्यापीठाचे या कामकाजाबाबत सुकाणू समिती सदस्य मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. आर.डी. कुलकर्णी व छत्रपती संभाजीनगर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरु वाल्मिक सरवदे यांनी आढावा बैठकीत समाधान व्यक्त केले.

राज्य शासनाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी बाबत सुकाणू समिती सदस्यांकडून विद्यापीठांच्या या कामकाजाबाबतचा आढावा घेण्यात येत आहे. त्यादृष्टीने शनिवार दि.१८ जानेवारी रोजी दुपारी ३.०० विद्यापीठात ही बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र- कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य एस.एस.राजपूत, मानवविज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य डॉ.जगदीश पाटील, डॉ.अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त महाविद्यालय), जळगावच्या प्राचार्य डॉ.गौरी राणे आणि धनाजी नाना महाविद्यालय, फैजपूरचे प्राचार्य डॉ. आर.बी.वाघुळदे हे उपस्थित होते.

प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी विद्यापीठाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबतचा अहवाल सादर करतांना समितीस सांगितले की, नव्या शैक्षणिक धोरणानुसार सर्वच विद्याशाखेतील अभ्यासक्रम सुधारित करण्यात आले असून ते लागू करण्यात आलेले आहेत. तसेच शासनाने सुचविलेल्यानुसार स्वयंम कोर्सेस करीता मार्गदर्शक नियमावली, मल्टीपल एन्ट्री आणि एक्झिटच्या मार्गदर्शक सूचना, कुलगुरु इंटर्नशिप प्रमोशन स्कीम, प्रोफेसर ऑफ प्रॅक्टीसची कार्यपध्दती, अभ्यासक्रम पुस्तकांचे मराठी रुपांतरण, स्कूल कनेक्ट यासह विविध महत्वपूर्ण विषयांवर विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दिली. प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य राजपूत यांनी पॉवर पॉईट प्रेझेंटेशनव्दारे अभ्यासक्रम रचना व इतर मुद्यांबाबत सविस्तर सादरीकरण केले. प्रभारी अधिष्ठाता प्राचार्य जगदीश पाटील यांनी देखील मानवविज्ञान विद्याशाखेतील अभ्यासक्रमांबाबत माहिती दिली.

प्राचार्य वाघुळदे आणि प्राचार्य डॉ. गौरी राणे यांनी महाविद्यालयांकडून नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा अहवाल समितीसमोर मांडला.

समिती सदस्य प्रा. आर.डी. कुलकर्णी व प्रा. सरवदे यांनी विद्यापीठाकडून नव्या शैक्षणिक धोरणच्या अंमलबजावणी बाबत केलेल्या कार्यवाहीचे कौतुक करीत समाधान व्यक्त केले व काही सुचना केल्या. आभार कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : मधुमेह आणि वजनावर नियंत्रण ठेवण्यासाठी जीवनशैलीत सुधारणा करण्याची गरज असून सम्यक आहार आणि व्यायाम करावा असे आवाहन सुप्रसिध्द आहार तज्ज्ञ डॉ.जगन्नाथ दीक्षित यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या  आंतरविद्याशाखा प्रशाळेतील योगशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. “चांगल्या आणि सर्वांगिण आरोग्याच्या दृष्टीने” हा त्यांचा व्याख्यानाचा विषय होता. कुलगुरू प्रा.व्ही.एल.माहेश्वरी अध्यक्षस्थानी होते. यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, प्रशाळेच्या संचालक डॉ.मनिषा इंदाणी, विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील उपस्थित होते.

डॉ.दीक्षित म्हणाले की, मधुमेह होण्याच्या खुप आधी शरीरात इन्सुलिन वाढलेले असते. इन्सुलिनची पातळी वाढली की वजन वाढते. इन्सुलिन कमी झाले तर वजन कमी होते. प्रत्येक वेळी खाल्ल्याने इन्सुलिन वाढते. भरपूर खाण्यासाठी माणसाचे शरीर निर्माण झालेले नाही. लोक अनावश्यक खातात त्यामुळे खाण्यावर नियंत्रण हवे. हे सांगतांना डॉ.दीक्षित यांनी दीक्षित लाईफ स्टाईलबद्दल सविस्तर माहिती दिली. ५५ मिनीटात जेवण पूर्ण करा, दिवसातून दोनच वेळा जेवण करा नियमित ४५ मिनीटे पायी चाला. गोड पदार्थानपासून दूर रहा. खाण्यात कार्बोहैड्रेड कमी करा आणि प्रोटीन वाढवा. मधुमेह निश्चितच नाहीसा होऊ शकतो असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा.माहेश्वरी यांनी मानसिक व शारीरिक आरोग्य हीच आपली संपत्ती असल्याचे सांगीतले. प्रारंभी डॉ.मनिषा इंदाणी यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन डॉ. लिना चौधरी यांनी केले. इंजि. राजेश पाटील यांनी आभार मानले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भुशास्त्र प्रशाळेत पीएम-उषा अंतर्गत आदिवासी समुदायाच्या विकासाठी कार्यक्रम या विषयावर एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेचे उद्धाटन प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे यांनी केले. संचालक प्रा.एस.एन.पाटील अध्यक्षस्थानी होते. विद्यापीठाने आदिवासी समुदायासाठी केलेल्या उपक्रमांची माहिती प्रा. इंगळे यांनी दिली. प्रा. एस.एन पाटील यांनी आदिवासी भागामध्ये झालेल्या प्रकल्पांचा आढावा घेतला. डॉ. रमजान तडवी, प्रा.भुषण चौधरी, डॉ. नरसिंह परदेशी, डॉ. महेंद्र महाजन यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले. ११९ विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते. डॉ. वाय. जे. महाजन यांनी प्रास्तावीक केले. मयुरी पाटील व श्रध्दा भदाणे यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. व्ही.एम.रोकडे यांनी आभार मानले.

**बातमी क्र - ४**

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पर्यावरण व भूशास्त्र प्रशाळेत भूगोल दिनानिमित्त हवामान बदल आणि मानवी जीवन या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमेश गोगडीया यांच्या हस्ते उद्धाटन झाले. प्रशाळेचे संचालक प्रा.एस.एन पाटील अध्यक्षस्थानी होते. यामध्ये ४० विद्यार्थी सहभागी झाले. प्रश्नमंजुषा , निबंधस्पर्धा, वक्तृत्व आणि पोस्टर्स सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. यावेळी मयुरी पाटील व श्रध्दा भदाणे यांनी सुत्रसंचालन केले. एन.बी. पाटील यांनी आभार मानले. यावेळी प्रा.एस.आर.थोरात, प्रा.एस.बी.अत्तरदे, प्रा.व्ही.एम. रोकडे, डॉ.के.पी.दांडगे, बी.डी.पाटील, आकाश तडवी, भावेश पाटील उपस्थित होते.

**बातमी क्र. ५**

जळगाव दि.१८ ( प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने सोमवार दि. २० जानेवारी रोजी सुप्रसिध्द कवयित्री सारिका उबाळे यांचे व्याख्यान विद्यापीठाच्या मुलींच्या वसतिगृहात आयोजित करण्यात आले आहे.

सहकार महर्षी स्व. प्रल्हादराव पाटील व्याख्यानमालेअंतर्गत सोमवारी सायंकाळी ५.३० वाजता बाबू जगजीवनराम मुलींच्या वसतिगृहात हे व्याख्यान होणार आहे. एस.एम.आय.टी.चे

चेअरमन ॲड रवींद्र पाटील यांनी दिलेल्या देणगीतून हे व्याख्यान आयोजित केले जाते. सारिका उबाळे या “नवतारुण्य, आत्मभान आणि आव्हान” या विषयावर बोलणार असून व्य.प.सदस्य प्रा.सुरेखा पालवे अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

----------------------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी करीता